**दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्र दिनांक 30 सप्टेंबर २०२०**

**( स्मार्ट जालना आवृत्ती )**

# मत्स्यसंपदा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**जालना/प्रतिनिधी**

देशातल्या मत्स्य व्यवसायात शाश्वत आणि जबाबदार विकासाच्या माध्यमातुन निलक्रांती घडवुन आणण्याच्या उदेशाने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.या योजनेची अंमलबजावणी सन २०२०-२१ ते २०२४ -२५ या पाच आर्थिक वर्षामध्ये करण्यात येणार आहे. जिल्हयातील सर्व आठ तालुकयाच्या ग्रामीण क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व मच्छीमार बांधव आणि हौशी मत्स्यसंवर्धन व इतर मत्स्य कास्तकार यांना आत्मनिर्भर बनवून त्यांना मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगारापूरती साधनसामग्री उपलब्ध करुन देणे ,तसेच त्यांच्या जीवनामध्ये बदल घडवुन आणणे व देशाच्या आर्थिक विकासात हातभर लावून मत्स्य उत्पादनात वाढ करण्याच्या हेतूने प्रधामंत्री मत्स्यसंपदा योजनेचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा मार्गदर्शक सुचनेप्रमाणे गोडया पाण्यातील मत्स्यसंवर्धन व मत्स्यशेतीस उपयुक्त काही योजनांची माहिती निकष व अर्थसहाय्य याबाबतची माहिती घेण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे संपर्क साधुन सन लाभ घेण्यासाठी १५ दिवसापर्यत अर्ज सादर करावे. असे आवाहन करण्यात आले.

https://digitaldg.in

अर्थसंकल्प
वार्षिक अहवाल
विषेश अर्थसहाय्य
माहिती अधिकार
पंचवर्षीय मत्स्यव्यवसाय गणना व सागरी मत्स्योत्पादन
मत्स्यव्यवसाय विषयक सांख्यिकी आकडेवारी
नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन
लोक सहभाग (सहकार जाळे)
मत्स्योद्योग विकास महामंडळ
शासकीय कर्मचा-यांकरीता

या यंत्रणांचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व सदस्य सचिव संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय हे असतात.

**मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजना.**

| बाब | दर | परिमाण | मर्यादा | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| तलाव बांधकाम(भुजल) | ६०,०००/- | हेक्टर | ५ | - |
| तलाव बांधकाम(भुजल) | ७५,०००/- | हेक्टर | ५ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस |
| तलाव बांधकाम(भुजल) | ८०,०००/- | हेक्टर | ५ | डोंगराळ क्षेत्रासाठी |
| तलाव बांधकाम(भुजल) | १,००,०००/- | हेक्टर | ५ | डोंगराळ क्षेत्रातील अनुसूचित जाती व जमातीस |
| तलावाचे नुतनिकरण | १५,०००/- | हेक्टर | ५ | - |
| तलावाचे नुतनिकरण | १८,०००/- | हेक्टर | ५ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस |
| प्रथम वर्षासाठी निविष्ठा | १०,०००/- | हेक्टर | ५ | - |
| प्रथम वर्षासाठी निविष्ठा | १२,५००/- | हेक्टर | ५ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस |
| गोड्या पाण्यातील मत्स्यबीज उबवणी केंद्र | १,२०,०००/- | संख्या | १ | १० दशलक्ष मत्सबीज प्रतिवर्ष क्षमतेच्या उबवणी केंद्रासाठी |
| गोड्या पाण्यातील मत्स्यबीज उबवणी केंद्र | १,६०,०००/- | संख्या | १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस |
| मत्स्यखाद्य प्रकल्प | १,५०,०००/- | संख्या | १ | - |
| गोड्या पाण्यातील लहान कोळंबी बीज उबवणी केंद्र | २,४०,०००/ | संख्या | १ | ५ ते १० दशलक्ष कोळंबी बीज प्रतिवर्ष क्षमतेच्या उबवणी केंद्रासाठी |
| शोभिवंत माशांसाठी उबवणी केंद्रासह एकात्मिक प्रकल्प उभारणी | १,५०,०००/- | संख्या | १ | - |



©मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र, भारत यांचे हे अधिकृत संकेतस्थळ आहे. सर्व अधिकार सुरक्षित.

Powered by